नि.दि.मु.क्र.१३५/२०१५ मधील नि.७५ वरील आदेश
**CNRNo.MHST16000766-2015**
(तुकाराम दिनकर यादव वगैरे वि. गुणाबाई ज्ञानोबा यादव वगैरे)

प्रस्तुतचा अर्ज वादीने दावा दुरुस्त करणेसाठी केला आहे.

वादीचे अर्जातील कथन थोडक्यात असे आहे की,

२. वादीने सदरचा दावा हा प्रतिवादी यांचेविरुध्द सरस निरस मानाने वाटप होऊन मिळणेकरीता दाखल केला आहे. दाव्याचे कामकाज चालू असताना प्रतिवादी क्र.७ यमुना यशवंत जगताप या दिनांक ३०.०५.२०२३ रोजी मयत झाल्या आहेत. हिंदु वारस कायद्याप्रमाणे त्यांना १ मुलगा व तीन मुली एवढेच वारस आहेत. त्यांना अन्य कोणीही वारस नाही. सदरची दुरुस्ती दाव्याचे कामी करणे आवश्यक असल्याने दाव्यात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी, ही विनंती वादीने केली आहे.

दाव्याचे सरनाम्यात प्रतिवादी क्र.७ हिच्या नावास कंस करण्यात यावा व त्याखाली "मयत" असे लिहण्यास यावे व त्याच्या खाली "वारस प्रतिवादी क्र.७अ ते ७ड " असे लिहण्यात यावे.

७अ- मिलिंद यशवंत जगताप
वय-५३, धंदा-नोकरी
रा.२११, सी १०, स्नेहबंध सोसायटी
एम.आय.डी.सी. वाई,
ता.वाई, जि.सातारा.

७ब- आरती श्रीकांत यादव
वय-६१, धंदा-घरकाम
रा.२०११, पुण्याई नगर,
नेहा बिल्डींग फ्लॅट नं.६,
के.के.मार्केट समोर गल्ली क्र.२
धनकवडी पुणे-४११ ०४३.

७क- अनिता मोहन कदम
वय-५८, धंदा-घरकाम
रा.स.नं.१०/२ शंभु गॅलेक्सी, फ्लॅट नं.१०३
मांगडेवाडी, हवेली-४११ ०४६.

७ड- अनुराधा चंद्रकांत मोरे
वय-६३, धंदा-घरकाम
रा.फ्लॅट नं.जी १०३ बिल्डींग-५ बी
जनरांजणी नांदेड सिटी, पुणे - ४११ ०४१

३. प्रतिवादी क्र.२ ने सदर अर्जावर नि.७८ वर म्हणणे दाखल केले असून अर्जातील कथने अमान्य केली आहेत. त्यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.७ या दिनांक ३०.५.२०२३ रोजी मयत झाल्या असून प्रतिवादी क्र.७ चे वारसांची दुरुस्ती करण्यास उशीर झाल्याने प्रतिवादी क्र.७ चे विरुद्ध अबेटमेंटचा आदेश करण्यात आला आहे. वादीचा दावा फेटाळण्यास पात्र आहे. प्रतिवादी क्र.७ ही वादी वारसांची जवळची नातेवाईक असून तिचे मृत्युची माहिती वादी यांना

प्रथमपासुनच असतानाही त्यांनी मुदतीत वारस रेकॉर्डवर घेतलेले नाहीत. मयत प्रतिवादी क्र.७ चे विरुद्ध आवश्यक तजवीज न करता तिचे नाव दाव्यातुन कमी करणेकामी मागितलेली दुरुस्ती ही कायदेशीर नाही. प्रतिवादी क्र.७ विरुद्ध दावा अबेट झाला असल्याने इतर प्रतिवादी यांना कायदेशीर बचाव प्राप्त झाला आहे. वादीने दाव्याचे कामी आवश्यक त्या तजवीज बरेच वर्षांपासुन केलेल्या नाहीत. वादी निव्वळ प्रतिवादींना त्रास देण्याच्या उद्देशाने दावा दाखल केला आहे व कामकाज लांबवित आहे. अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात यावा.

४. वादीचा अर्ज व दाव्यातील कथने तसेच अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने सदरचा दावा हा प्रतिवादी यांचेविरुध्द सरस निरस मानाने वाटप होऊन मिळणेकरीता दाखल केला आहे. सदर दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची आहे. सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच दाव्याचे स्वरुपातही बदल होणार नाही. याउलट दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्याकरीता सदरची दुरुस्ती मंजूर करणे योग्य होणार आहे. सबब दाव्याचे स्वरुप विचारात घेता व दाव्याचे अंतिम निराकरण होण्याकरीता अर्ज मंजूर करणे योग्य होईल. करिता, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादीने अर्जात नमुद केलेली दुरुस्ती नियमानुसार विहीत वेळेत करावी व दुरुस्त प्रत १४ दिवसांचे आत दाखल करावी.

CHHAYA VIKRAM SHIRSAT

Digitally signed by CHHAYA VIKRAM SHIRSAT
Date: 2024.06.14 17:03:05 +0530

(सी. व्ही. शिरसाट)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर वाई.

ठिकाण - वाई.
दिनांक - १३.०६.२०२४